प्रेसनोट दिनांक २९/०४/२०१९

**''छोटी चिमुकली मिशीका दासवानी वय ५ वर्ष हिने पुणे पोलीसांनी केलेल्या कामगिरीबद्दल दिले पुणे पोलीस आयुक्तांना प्रशस्तीपत्र.''**

दिनांक ३१/०१/२०१९ रोजी नियंत्रण कक्ष, पुणे शहर व्ही.एच.एफ़.या ठिकाणी एका अनोळखी महिलेने फ़ोन केला, की त्यांच्या व्हाटस्‌अप ग्रुपवर एक मेसेज आला आहे की, एक अनोळखी महिला ही औंध परिसरात आत्महत्या करण्याचा प्रयत्न करीत आहे. आहे. त्यानंतर व्हीएचएफ़ कंट्रोल रुम येथुन पो.उप निरिक्षक सोनवणे यांना व्हीएचएफ़चे व पो.हवा. मोहिते यांनी तात्काळ सदरची माहीती सायं.१७/००वा. कळविले व चतुश्रृंगी पोलीस स्टेशन औंध मार्शल यांना वायरलेसवरुन माहीती दिली. त्यानंतर संबधित मार्शलने संपुर्ण औंध परिसरांतील नदीचे पुल चेक केले. कोठेही सदरची महिला आढळुन आली नाही.

सदर महिला मिळुन न आलेने व्हीएचएफ़ चे पो.हवा.राजु मोहिते यांनी त्याबाबत खडकी व विश्रांतवाडी पोलीस स्टेशनला वायरलेस वरुन शोध घेण्याबाबत कळविले असता खडकी पो.स्टे. येथील मरीआई मार्शल यांनी सदरचा कॉल ऐकुन त्यांनी होळकर ब्रिजच्या दिशेने पाहाणी केली असता ज्ञानेश्वर घाटाकडे एक महिला आत्महत्या करण्याचे इराद्याने सायं.१७/३०वा. जीव देण्यासाठी जात असताना तिच्या हावभावावरुन दिसुन आलेने त्यांनी सदरची महिलेस मरीआई मार्शलवरील पोलीस कर्मचारी पो.कॉ.आबनावे व पो.कॉ.म्हस्के यांनी तिला आत्महत्या करणेपासुन परावृत्त करुन खडकी पोलीस स्टेशनला घेवुन गेले त्याठिकाणी तिचे नातेवाईकांचे ताब्यात देण्यात आले.

तरी व्हीएचएफ़ चे पो.हवा.धर्मराज मोहिते, खडकी पो.स्टे.कडील मरीआई मार्शल वरील कर्मचारी कर्मचारी पो.ना.आबनावे, पो.शि.म्हस्के यांनी प्रसंगावधान दाखवुन कर्तव्यावर दाखविलेले सतर्कतेमुळे एक महिलेला आत्महत्या करण्यापासुन परावृत्त करुन तिचा जीव वाचविला आहे.

वरील कर्मचा-यांनी केलेल्या उत्कृष्ठ कामगिरीबद्दल क्रिएटीव्ह वुमन ग्रुपच्या श्रीमती प्राची दासवानी यांनी पोलीस आयुक्त पुणे शहर यांना भेटुन सदरच्या पोलीसांचे अभिनंदन करुन त्यांना प्रशस्तीपत्र दिलेले आहे.


महाराष्ट्र पोलीस
THANKYOU


महाराष्ट्र पोलीस
THANKYOU